**Fermenta Biotech Limited**
CIN: L99999MH1951PLC008485
Regd. Office: A - 1501, Thane One, DIL Complex, Ghodbunder Road,
Majiwade, Thane (W) - 400 610, Maharashtra, India.
Tel. : +91-22-6798 0888 Email : info@fermentabiotech.com,
Website : www.fermentabiotech.com

September 16, 2026

**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai – 400 001
Scrip Code: **506414**

**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, Plot No. C/1,
G Block, Bandra - Kurla Complex,
Bandra (East), Mumbai 400 051
Trading Symbol: **FERMENTA**

Dear Sir,

**Sub: Fermenta Biotech Limited - Publication of Notice to equity shareholders**

Pursuant to Regulations 30 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing herewith copy of the newspaper publication published in Business Standard, Mumbai (English version) and Sakal, Mumbai (Marathi version) dated September 16, 2026 for your reference and record.

Thanking you,

Yours faithfully,
**For Fermenta Biotech Limited**

VARADVINAYAK VIJAY KHAMBETE
Digitally signed by VARADVINAYAK VIJAY KHAMBETE
Date: 2026.09.16 14:09:37 +05'30'

**Varadvinayak Khambete**
Company Secretary & Head – Legal
Membership No. A33861
Encl: as above

## ‘सप’ नेत्याची गोळ्या झाडून हत्या

प्रयागराज : उत्तर प्रदेशातील हंडिया पोलिस ठाण्याच्या हद्दीत समाजवादी पक्षाचे नेते पवन यादव यांच्यावर मंगळवारी गोळीबार करण्यात आला. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर पोलिसांकडून परिसरात बंदोबस्त वाढविण्यात आला असून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

# अवकाशात तैनात केली शस्त्रे

## अमेरिकेची पहिल्यांदाच कबुली; उपग्रहांवर हल्ल्यांचे लक्ष्य?



वॉशिंग्टन, ता. १५ (वृत्तसंस्था) : पृथ्वीच्या कक्षेत अवकाशात शस्त्रे तैनात केल्याची जाहीर कबुली अमेरिकेने पहिल्यांदाच दिली आहे. अंतराळातील अमेरिकेच्या लष्करी उपकरणांचे शत्रूच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यास ही शस्त्रे सक्षम असल्याचा दावा अमेरिकेचे हवाई दल सचिव ट्रॉय मिंक यांनी केला आहे.

मेरीलँड येथे सोमवारी (ता. १४) झालेल्या ‘एअर अँड स्पेस फोर्सेस असोसिएशन’च्या परिषदेत मिंक यांनी ही माहिती दिली. मात्र, हे शस्त्र नेमके कोणते आहे, ते कधी तैनात करण्यात आले किंवा त्याची क्षमता काय आहे, याबाबत त्यांनी माहिती दिली नाही.

‘‘अमेरिकेकडे आता पृथ्वीच्या कक्षेत ‘स्पेस कंट्रोल’ शस्त्रे आहेत. ती शत्रूराष्ट्रांच्या कारवायांपासून संरक्षण करू शकतात,’’ असे मिंक म्हणाले. पत्रकारांनी अधिक माहिती विचारल्यानंतर त्यांनी, ‘‘शस्त्राचा प्रकार किंवा त्याची वैशिष्ट्ये सांगणार नाही. तसे केल्यास त्याचा प्रतिबंधक परिणाम कमी होईल,’’ असे उत्तर दिले.अमेरिकेच्या या घोषणेमुळे पृथ्वीच्या कक्षेत सुरू झालेली शस्त्रास्त्र स्पर्धा आणखी वेग घेण्याची शक्यता आहे.

**अंदाज काय?**

‘सिक्युअर वर्ल्ड फाउंडेशन’च्या व्हिक्टोरिया सॅमसन यांच्या मते, ही अवकाशातील जॅमिंग सिस्टीम असू शकते. सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीजचे क्लेटन स्वोप यांच्या मते, चीन किंवा रशियाला नेमका धोका किती आहे, हे स्पष्टपणे न समजण्यासाठी अमेरिकेने या शस्त्रतैनातीची माहिती संदिग्ध ठेवली आहे.

### अवकाशातील शस्त्र म्हणजे काय?

- पृथ्वीभोवती फिरणाऱ्या उपग्रहांच्या कक्षेत तैनात केलेली लष्करी यंत्रणा.
- शत्रूच्या उपग्रहांमध्ये अडथळा निर्माण करणे, त्यांची यंत्रणा बंद पाडणे किंवा गरज पडल्यास त्यांचा नाश करणे ही त्याची संभाव्य कामे.
- संबंधित शस्त्रे क्षेपणास्त्रे रोखण्यासाठी किंवा स्वतःच्या उपग्रहांचे संरक्षण करण्यासाठीही वापरली जाऊ शकतात.

### ‘स्पेस कंट्रोल’ म्हणजे काय?

- अमेरिकेच्या ‘स्पेस फोर्स’ने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, ‘स्पेस कंट्रोल’ म्हणजे अवकाशातील कारवायांवर नियंत्रण ठेवणे आणि आवश्यक असल्यास शत्रूच्या अंतराळ यंत्रणांना निष्प्रभ करणे. यामध्ये दोन प्रकारांचा समावेश असतो
- उपग्रह, इतर अंतराळ यंत्रणांवर प्रत्यक्ष हल्ला करून त्यांचा नाश करणे.
- ‘जॅमिंग’, ‘सिग्नल’मध्ये अडथळा निर्माण करणे किंवा उपग्रहाची कार्यक्षमता कमी करणे. (यामध्ये उपग्रह पूर्णपणे निकामी केला जात नाही.)

# ‘यूपीआय’वर शुल्काचे सावट

केंद्र सरकारने ‘यूपीआय’च्या दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या खरेदीवर ०.४ टक्के ‘एमडीआर’ शुल्क लागू केले आहे. या निर्णयामुळे व्यवहारांवर त्याचे परिणाम होण्याची शक्यता आहे.

‘यूपीआय’ मोफत असल्याबद्दल अनेक दिवसांपासून बँकांकडून आक्षेप करण्यात येत होता. ‘यूपीआय’च्या व्यवहारांसाठी सायबर सुरक्षा, वीज, सर्व्हर यांवर होणाऱ्या खर्चाबद्दल सरकारकडून बँकांना वर्षाला तीन ते चार हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात येत होता, तो बँकांसाठी अपुरा होता. आता या ०.४ टक्के शुल्कातून १६ हजार कोटी रुपयांचा महसूल जमा होईल. त्यातील ४० टक्के रक्कम बँकांना, ३० टक्के रक्कम यूपीआय यंत्रणा आणि ३० टक्के रक्कम पेमेंट ॲग्रीगेटरना जाईल.

दोन हजार रुपयांपर्यंतचे यूपीआय आणि रुपे डेबिट कार्डचे व्यवहार मोफतच राहतील. देशात ९६ टक्के यूपीआय व्यवहार दोन हजार रुपयांच्या आतच होतात.

### छुपे शुल्क आकारण्यास मनाई

- यूपीआय ॲप पुरवठादारांना प्लॅटफॉर्म शुल्क किंवा छुपे शुल्क आकारण्यास मनाई.
- शुल्क ग्राहकांकडून वसूल केले जाणार नाही, याची खात्री करण्याच्या बँकांना सूचना.
- वैयक्तिक वापरकर्त्यांसाठी मोफत यूपीआय व्यवहारांवर मासिक कोटा, व्यवहारांची संख्या किंवा टप्प्यानुसार मर्यादा नाही.
- व्यवहाराच्या प्रकारानुसार बँका आणि एनपीसीआयकडून दररोजच्या व्यवहारांवर कमाल मर्यादा लागू राहणार; काही श्रेणींसाठी ही मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत.
- छोट्या व्यापाऱ्यांमध्ये यूपीआयचा वापर वाढविण्यासाठी स्वतंत्र निधी स्थापन केला जाणार. त्यासाठी एकूण एमडीआरमधून मिळणाऱ्या शुल्काच्या ५ टक्के रक्कम योगदान म्हणून दिली जाईल.



### रोकडचा वापर वाढणार

व्यावसायिकांकडून ‘दोन हजारांवरील व्यवहारांसाठी फक्त रोकड’ असे फलक लागले, तर तो डिजिटल इंडियासाठी धक्का असले. एका अहवालानुसार, दोन हजार रुपयांवरील व्यवहारांचे प्रमाण चार टक्के असले, तरी त्याचे मूल्य ६७ टक्के आहे. याचा अर्थ सोने, इलेक्ट्रॉनिक्स, कापड व्यापाऱ्यांवर याचा सर्वांत मोठा फरक पडणार आहे.

### छोटा व्यापारी कोण?

सरकार म्हणते छोट्या व्यापाऱ्यांना लागणार नाही, पण एक ते दीड कोटी उलाढाल असलेल्यांना लागेल. या गोंधळात अनेक व्यापारी भरडले जातील.

फास्ट न्यूज

### माजी ‘पीए’च्या आईला उमेदवारी

कोलकता (पीटीआय) : पश्चिम बंगालमधील पोटनिवडणुकांसाठी भाजपने आज उमेदवारांची नावे जाहीर केली. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांचे माजी स्वीय साहायक चंद्रनाथ रथ यांची आई हसिरानी रथ यांना भाजपने नंदीग्राम विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर केली आहे. तसेच रेझीनगर मतदारसंघातून पक्षाचे मुर्शिदाबादचे माजी जिल्हाध्यक्ष शाखारव सरकार यांना रिंगणात उतरविले.

### राजस्थानमध्ये भाजपची बाजी

जयपूर (पीटीआय) : राजस्थानमधील महापालिका निवडणुकीत भाजपने बाजी मारली आहे. या पक्षाने ४,१७९ वॉर्डांमध्ये विजय मिळविला, तर विरोधकांना ३,६१३ वॉर्डांमध्ये यश मिळाले. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी ‘छात्रों की गूंज’ हा कार्यक्रम ज्या कोटामधून सुरू केला होता, तेथे आणि आणखी तीन महानगरपालिकांमध्ये भाजपला बहुमत मिळाले. दहा पैकी चार महानगरपालिकांमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले असून येथे या पक्षाचा महापौर निवडून येणार असल्याचा दावा भाजपतर्फे करण्यात आला आहे.

### भंगाराच्या विल्हेवाटीतून कमाई

नवी दिल्ली : सरकारी कार्यालयांमध्ये राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमांदरम्यान मोडीत काढलेल्या (भंगार) वस्तूंची विल्हेवाट लावून गेल्या पाच वर्षांत पाच हजार १०२ कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळाला आहे, अशी माहिती केंद्र सरकारने दिली. सर्व सरकारी कार्यालयांमध्ये ‘स्वच्छते’ची सवय रुजविणे हा या मोहिमांचा उद्देश आहे. भंगाराच्या विल्हेवाटीतून ५,१०२.९१ कोटींचा महसूल मिळाल्याची माहिती कार्मिक मंत्रालयाने निवेदनात दिली.

### अवामी लीगच्या सात नेत्यांना मृत्युदंड

ढाका (पीटीआय) : माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग या पक्षाच्या सात नेत्यांना बांगलादेशमधील आंतरराष्ट्रीय फौजदारी लवादाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. २०२४ च्या जुलै महिन्यात हसीना यांच्या सरकारविरोधात पेटलेल्या विद्यार्थी आंदोलनावेळी हिंसाचार घडवून आणल्याप्रकरणी या सर्वांना दोषी ठरविण्यात आले आहे. तीन सदस्यीय लवादाने आरोपी नेत्यांच्या अनुपस्थितीत सुनावणी घेत हा निकाल दिला.

### दारासिंहच्या मुदतपूर्व सुटकेस नकार

भुवनेश्वर : ऑस्ट्रेलियन मिशनरी ग्रॅहम स्टेन्स आणि त्यांच्या दोन अल्पवयीन मुलांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या रवींद्र कुमार पाल ऊर्फ दारासिंह याची तुरुंगातून मुदतपूर्व सुटका करण्याची मागणी ओडिशा सरकारने फेटाळली आहे.केओंझार जिल्ह्यातील मनोहरपूर येथे १९९९मध्ये ग्रॅहम स्टेन्स आणि त्यांच्या दोन मुलांना वाहनात जिवंत जाळण्यात आले होते.

# ट्रम्प प्रशासनाला न्यायालयाचा पुन्हा धक्का

## विदेशी विद्यार्थ्यांच्या व्हिसावरच्या मर्यादेला स्थगिती

वॉशिंग्टन, ता. १५ (पीटीआय) : अमेरिकेतील विदेशी विद्यार्थी, पत्रकार, तात्पुरता व्हिसा घेऊन आलेले नागरिक यांच्या वास्तव्यावर मर्यादा घालण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या नव्या नियमाला फेडरल न्यायालयाने स्थगिती दिली आहे. हा नियम मंगळवारपासून लागू होणार होता. त्यापूर्वी सोमवारी मॅसॅच्युसेट्समधील फेडरल जिल्हा न्यायालयाने त्याच्या अंमलबजावणीस अंतरिम स्थगिती दिली.

‘नवा नियम अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला आणि उच्च शिक्षण व्यवस्थेला विध्वंसक परिणाम घडवून आणू शकतो,’ असे न्यायालयाने नमूद केले. देशाच्या सुरक्षेसाठी हा नियम आवश्यक असल्याचा सरकारचा दावा न्यायालयाने फेटाळून लावला. या निर्णयामुळे अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना विशेषतः मोठ्या संख्येने असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

ट्रम्प प्रशासनाने जुलैमध्ये अंतिम केलेल्या नियमात विदेशी विद्यार्थी आणि तात्पुरता व्हिसा घेऊन आलेल्या सहभागींच्या व्हिसासाठी चार वर्षांची मर्यादा निश्चित करण्यात आली होती. पत्रकारांच्या व्हिसासाठी २४० दिवसांची मर्यादा प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र, चीनमधील पत्रकारांसाठी ही मर्यादा ९० दिवसांची ठेवण्यात आली होती. नव्या नियमामुळे अनेक दशकांपासून अस्तित्वात असलेली ‘ड्युरेशन ऑफ स्टेटस’ ही पद्धत संपुष्टात आली असती. या पद्धतीनुसार, विदेशी विद्यार्थ्यांना त्यांचा शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू असेपर्यंत आणि व्हिसाच्या अटींचे पालन होत असेपर्यंत अमेरिकेत राहण्याची परवानगी मिळत होती.

# शुल्काचा भार अखेरीस ग्राहकांवरच : राहुल गांधी

नवी दिल्ली, ता. १५ : केंद्र सरकारने दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या ‘यूपीआय’ व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग गुपचूप खुला केला असल्याचा आरोप काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केला आहे. व्यापारी अखेरीस हे शुल्क ग्राहकांकडून वसूल केले जाऊ शकतात, असाही दावा राहुल गांधीं यांनी केला आहे.

केंद्र सरकारने ‘पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स’ कायद्यानुसार केलेल्या बदलांची अधिसूचना सोमवारी (ता.१४) जारी केली. त्यात दोन हजार रुपयांपर्यंतच्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) व्यवहारांवर कोणतेही शुल्क आकारता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यापार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी ‘एक्स’वरील पोस्टद्वारे टीका करताना म्हटले, की ग्राहकांकडून थेट शुल्क आकारले गेले नाही, तरी व्यापारी वस्तूंच्या किमती वाढवून व्यापारी हे शुल्क ग्राहकांकडून वसूल करू शकतात.

### अमेरिकेतील पेमेंट कंपन्यांच्या दबावाला बळी

अमेरिकेतील पेमेंट कंपन्यांच्या दबावाला केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार बळी पडले असल्याचाही दावा गांधी यांनी केला. अमेरिकेतील पेमेंट कंपन्या भारताच्या ‘शून्य एमडीआर’ धोरणाला दीर्घकाळापासून विरोध करत आहेत. आता मोदी सरकारने नेमक्या त्याच दिशेने धोरण बदलण्याचा मार्ग खुला केला आहे. अमेरिकेबरोबरील व्यापार कराराप्रमाणेच, तडजोड करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा अमेरिकेच्या दबावापुढे झुकत आहेत, असा टोला त्यांनी लगावला.



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या निवासस्थानी गणपतीची आरती केली. त्यावेळी गोयल आणि त्यांच्या पत्नी उपस्थित होत्या.

# न्यूझीलंडबरोबरील ‘एफटीए’ ऑक्टोबरपासून

## भारताकडून होणारी निर्यात १०० टक्के शुल्कमुक्त

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. १५ : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार करार (एफटीए) ऑक्टोबरच्या उत्तरार्धात लागू होण्याची शक्यता आहे. कराराच्या अंमलबजावणीची नेमकी तारीख लवकरच जाहीर केली जाईल, अशी माहिती वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज दिली.

वस्तू आणि सेवांमधील द्विपक्षीय व्यापार वाढविण्यास, तसेच गुंतवणुकीला चालना देण्यासाठी भारत आणि न्यूझीलंडने २७ एप्रिल रोजी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. या करारामुळे भारताच्या न्यूझीलंडला होणारी १०० टक्के निर्यात शुल्कमुक्त होणार आहे. हा करार ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात लागू होणार असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘‘कराराच्या अंमलबजावणीची नेमकी तारीख लवकरच जाहीर केली जाईल. दोन्ही देशांना अंमलबजावणीची प्रक्रिया आणि कार्यपद्धतींचा पूर्ण आढावा घ्यायचा आहे.’’ सूत्रांच्या म्हणण्यानुसार हा करार १९ ऑक्टोबरपासून लागू होण्याची शक्यता आहे. सध्या न्यूझीलंडकडून सिरॅमिक्स, गालिचे, मोटारी आणि मोटारींचे सुटे भाग यांसारख्या प्रमुख भारतीय वस्तूंवर १० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क आकारले जाते. मुक्त व्यापार करारामुळे या वस्तूंच्या निर्यातीला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

### व्यापार संतुलनासाठी प्रयत्न

दिल्लीतील ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान झालेल्या चर्चेनंतर भारत व चीन द्विपक्षीय व्यापारातील असमतोल दूर करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचेही अग्रवाल यांनी सांगितले. दोन्ही देश व्यापारातील संरचनात्मक असमतोल, पुरवठा साखळीतील अडचणी व इतर प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना शोधत आहेत. व्यापारातील तूट कमी करून व्यापार अधिक संतुलित करण्यावर भर दिला जात आहे, असे वाणिज्य सचिवांनी स्पष्ट केले.

# सौदीत हल्ल्यानंतर तेलपुरवठा विस्कळित

## दुरुस्तीसाठी पाच आठवड्यांचा कालावधी

कैरो, ता. १५ (पीटीआय) : सौदी अरेबियातील एका महत्त्वाच्या पाइपलाइनवर झालेल्या हल्ल्यानंतर ती दुरुस्त करण्यासाठी तीन ते पाच आठवडे लागणार असून, तोपर्यंत या वाहिनीतून होणारा तेलपुरवठा विस्कळित राहणार आहे. दरम्यान, हौथी बंडखोरांनी महत्त्वाच्या बेटांवर ताबा मिळवल्याने सौदी अरेबियाच्या तेल निर्यातीला फटका बसला आहे.

इराणसोबतच्या युद्धामुळे सौदी अरेबियाला आपली निर्यात पर्शियन आखाताऐवजी इतर मार्गांनी वळवावी लागली आहे, कारण इराणच्या हल्ल्यांमुळे होर्मुझची सामुद्रधुनी या एकमेव बाहेर पडण्याच्या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. सौदी अरेबिया आपल्या देशातून १,२०० किलोमीटर जाणाऱ्या ‘ईस्ट-वेस्ट पाइपलाइन’वर अवलंबून होता. या वाहिनीद्वारे आखाती बंदरांवरील कच्चे तेल तांबड्या समुद्रातील ‘यानबू’ बंदरापर्यंत नेले जाते आणि तिथून टँकरद्वारे निर्यात केले जाते. मात्र, गुरुवारी झालेल्या ड्रोन हल्ल्यानंतर ही पाइपलाइन बंद करावी लागली. सौदी अरेबियाने या हल्ल्यासाठी इराकमधील इराण समर्थक संघटनांना जबाबदार धरले आहे.

## नेपाळमधील बचावकार्य आता अंतिम टप्प्यात

नुवाकोट, ता. १५ (पीटीआय) : चिलिमे बोगद्याचा अडथळा दूर करून सहा कामगार अडकलेल्या भूमिगत ‘पॉवर हाउस’पर्यंत पोहोचण्यासाठी भारत आणि नेपाळच्या संयुक्त बचाव पथकाचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले आहेत, अशी माहिती प्रशासनाने दिली. कामगारांच्या सुटकेसाठी बचाव पथकातील कामगार बोगद्यात आणखी पुढे जाणार आहेत, असेही सांगण्यात आले.

# ‘एआय’वर नियंत्रणाची गरज नाही : ट्रम्प

## चीनला संधी देण्यास नकार

डब्लिन, ता. १५ (पीटीआय) : कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) क्षेत्रातील विकासावर प्रशासकीय नियंत्रण आणण्यास अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज नकार दिला. या क्षेत्रात चीनबरोबर स्पर्धा अत्यंत तीव्र असून अमेरिकेतील ‘एआय’ क्षेत्रावर नियंत्रण आणत चीनला अकारण संधी निर्माण करून देण्याची गरज नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. तसेच, या तंत्रज्ञानाच्या विकासातूनच त्यापासून असलेल्या धोक्यांवर तोडगा काढता येणे शक्य असल्याचा विश्वास त्यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

‘एआय’चा विकास होण्याबरोबरच त्याचा गैरवापर करण्याचे प्रकार वाढल्यामुळे या क्षेत्रासाठी नियमांची एक चौकट आखून देण्याची मागणी जगभरातून होत आहे. काही प्रमाणात अंकुश ठेवण्यास हरकत नसल्याचे ट्रम्प यांचे म्हणणे असले तरी कंपन्यांवर थेट नियंत्रण येईल, असे नियम तयार करण्यास त्यांनी असहमती दर्शवली. ‘‘आपण थोड्याप्रमाणावर देखरेख ठेवू शकतो, आणखीही काही तरी करू शकतो. मात्र, या क्षेत्राच्या विकासाबाबत नकारात्मक बोलले जात आहे. जे कधीही घडलेलेच नाही, ते घडेल अशी भीती उगाचच व्यक्त केली जात आहे. ‘एआय’ क्षेत्रात जो पुढे जाईल, तोच विजयी होईल,’’ असे ट्रम्प यांनी सांगितले.

## भीषण आगीत चौघांचा होरपळून मृत्यू

**सकाळ वृत्तसेवा**

बेळगाव, ता. १५ : बेळगावातील चव्हाट गल्ली परिसरात काल रात्री उशीरा घराला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील चौघांचा होरपळून मृत्यू झाला. अन्य दोघे जखमी असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

दमोने यांच्या घरातून रात्री अचानक आगीच्या ज्वाळा उसळू लागल्या. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करून संपूर्ण घराला वेढा घातला. घरातील सदस्यांना बाहेर पडण्याची संधीही मिळाली नाही. शॉर्टसर्किट आणि घरामधील फ्रीजचा अचानक स्फोट झाल्यामुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# हे ‘ती’च्या हक्काचे उल्लंघन : न्यायालय

## अल्पवयीन मुलीला गर्भपातास संमती

नवी दिल्ली, ता. १५ (पीटीआय) : बलात्कारातून झालेली गर्भधारणा सुरू ठेवण्यास पीडितेला भाग पाडणे व तिच्यावर इच्छेविरुद्ध मातृत्वाची जबाबदारी लादणे हे सन्मानाने जगण्याच्या तिच्या हक्काचे गंभीर उल्लंघन ठरेल, असे मत दिल्ली उच्च न्यायालयाने व्यक्त केले. पंधरावर्षीय पीडितेला गर्भपातास परवानगी देताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदविले. या अल्पवयीन पीडितेचा गर्भ ३० आठवड्यांपेक्षा अधिक कालावधीचा आहे.

वैद्यकीय गर्भपात (एमटीपी) कायद्याच्या कलम तीननुसार, कायद्यात नमूद केलेल्या विशिष्ट श्रेणीतील महिलांना निर्धारित कायदेशीर अटींच्या अधीन राहून २० आठवड्यांपेक्षा अधिक आणि २४ आठवड्यांपर्यंतची गर्भधारणा समाप्त करण्याची परवानगी आहे. हा प्रकार वेदनादायी असल्याचे नमूद करत न्यायाधीश मधू जैन म्हणाले, की पीडितेच्या गर्भधारणेचा कालावधी कायद्यातील निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक झाला आहे, या बाबीचा स्वतंत्रपणे विचार करता येणार नाही. लैंगिक अत्याचारातून पीडितेला राहिलेली गर्भधारणा पुढे कायम ठेवण्यास भाग पाडून तिच्यावर मातृत्वाची जबाबदारी लादणे हे तिच्या सन्मानाने जीवन जगण्याच्या हक्काचे गंभीर उल्लंघन आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# ‘एआय’च्या परिणामांसाठी जग तयार नाही

## गैरवापराला आळा घालण्यासाठी नियमांची गरज : बिल गेट्स यांची चिंता

वॉशिंग्टन, ता. १५ (वृत्तसंस्था) : ‘‘कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) समाजात होणाऱ्या मोठ्या बदलांना सामोरे जाण्यासाठी जगातील कोणतेही सरकार पुरेसे तयार नाही,’’ असा इशारा मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांनी आज दिला. ‘एआय’मुळे रोजगाराच्या स्वरूपात मोठे बदल होऊ शकतात, सायबर हल्ल्यांचा धोका वाढू शकतो आणि ‘एआय’शी संवाद साधण्याचे व्यसनही लोकांना व्यसन लागू शकते, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे.

‘एआय’च्या वेगाने होणाऱ्या विकासाच्या तुलनेत सरकारांची तयारी खूपच मागे आहे, असे गेट्स यांनी ‘रॉयटर्स’ला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. ‘एआय’च्या काही गंभीर परिणामांसाठी जग अद्याप तयार नसल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले आहे.

### अमेरिका-चीनमध्ये स्पर्धा

‘एआय’च्या क्षेत्रातील चीनच्या वेगवान प्रगतीचे गेट्स यांनी कौतुक केले. अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांकडे अत्याधुनिक ‘एआय’ प्रारूप विकसित करण्याची क्षमता असलेल्या अनेक संस्था आहेत. दोन्ही देशांतील सर्वोत्तम ‘एआय’ प्रारूपांमध्ये फार मोठा फरक नसल्याचेही त्यांनी म्हटले.

### ‘एआय’साठी एक अब्ज डॉलर

नवी दिल्ली : जगातील अनेक भागांमधील वंचित लोकांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि ‘एआय’वर आधारित उपाय, संधी आणि माहितीची उपलब्धता पोहोचविण्यासाठी गेट्स फाउंडेशनने पुढील दोन वर्षांत किमान एक अब्ज अमेरिकन डॉलर खर्च करण्याची घोषणा केली आहे.

जाहिरात

**बसीन उर्दू एज्युकेशन सोसायटी संचलित, हुजैफा उर्दू हायस्कूल वसई**
तालुका : वसई, जि : पालघर करिता (शासकीय नियमानुसार) खालील शिक्षण सेवक पाहिजे.
(अल्पसंख्यांक शाळा, उर्दू माध्यम, 100% अनुदानित तत्त्वावर)

| अनु.क्र. | शिक्षक | गट | पद | शैक्षणिक पात्रता | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षणसेवक | ६ वी ते ८ वी | १ | B.A., B.Ed. | १) समाजशास्त्र (उर्दू माध्यम) २) उमेदवारास उर्दू भाषा बोलता-वाचता व लिहिता येणे तसेच TET/CTET Paper II अनिवार्य आहे. |

नियुक्ती शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, पालघर व विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, यांच्या मान्यतेच्या अधीन आहेत.
**२४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** मुलाखती करिता खालील पत्त्यावर सर्व बाबतीत पूर्ण केलेला अर्ज व मूळ कागदपत्रांसह हजर राहावे.
**बसीन उर्दू एज्युकेशन सोसायटी,** हुजैफा उर्दू हायस्कूल व ज्यू. कॉलेज इमारत, १ ला मजला, हाथी मोहल्ला, वसई (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर - महाराष्ट्र ४०१२०१.
**मोबाईल नं. ९८६०२३५९१८ / ९६५३४२१२७०**

सही/-
(एजाज अहमद शेख)
अध्यक्ष
बसीन उर्दू एज्युकेशन सोसायटी हाथी मोहल्ला - वसई (पश्चिम), ता. वसई जि- पालघर- ४०१२०१

fbl fermenta
**फरमेंटा बायोटेक लिमिटेड**
कॉर्पोरेट आयडेन्टिफिकेशन नंबर : L99999MH1951PLC008485
नोंदणीकृत कार्यालय : ए-१५०१, ठाणे वन, ‘डीआयएल’ कॉम्प्लेक्स, घोडबंदर रोड, माजिवाडा, ठाणे (पश्चिम) - ४०० ६१०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी: +९१-२२-६७९८ ०८०० / ८८८
ई-मेल: info@fermentabiotech.com • वेबसाईट: www.fermentabiotech.com

**इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) मध्ये समभाग हस्तांतरीत करण्याबाबत समभागधारकांना सूचना**

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड ऑथोरिटी (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर ॲण्ड रिफंड) रूल्स २०१६ (वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार)(‘रूल्स’) बरोबर वाचले जाणारे कंपनी कायदा कलम २०१३ चे कलम १२४(६) व इतर लागू होणाऱ्या तरतुदी यांच्यानुसार सलग सात वर्षे किंवा त्याहून अधिक काळ भागधारकांना लाभांशाचे वाटप झालेले नाही किंवा त्यासाठी दावा करण्यात आलेला नाही असे सर्व समभाग फर्मेंटा बायोटेक लिमिटेड (कंपनी) कडून इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यात येतील.

ज्यांचे समभाग आयईपीएफ डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरीत करावयाचे आहेत अशा भागधारकांनी वाटप न झालेल्या लाभांशाचा दावा करण्यासाठी आवश्यक ती कारवाई सुरू करावी यासाठी कंपनीने संबंधीत भागधारकांबरोबर स्वतंत्रपणे पत्रव्यवहार (संपर्क) केलेला आहे. कंपनीने अशा भागधारकांचा तपशील, तसेच त्यांना हस्तांतरित करावयाचे इक्विटी शेअर्स यांची माहिती आपल्या www.fermentabiotech.com या संकेतस्थळावर अपलोड केली आहे. वर असे भागधारक आणि हस्तांतरीत होण्यास पात्र असणारे समभाग यांची माहिती अपलोड केलेली आहे. याद्वारे अशा प्रकारच्या सर्व भागधारकांना सूचित करण्यात येत आहे की त्यांनी आपल्या समभागांचे आयईपीएफ डीमॅट खात्यामध्ये होणारे हस्तांतरण टाळण्यासाठी वर्ष २०१९-२० (अंतरिम लाभांश) पासूनच्या वित्तिय वर्षांच्या वाटप न झालेल्या लाभांशासाठी दावा करण्याच्या हेतूने कंपनी आणि/किंवा तिचे रजिस्ट्रार ॲण्ड ट्रान्सफर एजंट्स, एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रा. लि. (पूर्वी लिंक इनटाईम इंडिया प्रा. लि. म्हणून ओळखले जाणारे) (‘आर ॲण्ड टी एजंट्स’) यांच्याकडे बुधवार, १८ नोव्हेंबर २०२६ पूर्वी अर्ज करावा. हे लक्षात घ्यावे की कंपनी किंवा आर ॲण्ड टी एजंट्सकडे बुधवार, १८ नोव्हेंबर २०२६ पर्यत कोणताही प्रतिसाद किंवा दावा प्राप्त झाला नाही, तर कायदेशीर तरतुदींचे पालन करण्यासाठी कंपनीला पुढील सूचना न देता संबंधित समभागांचे आयईपीएफ डीमॅट खात्यात हस्तांतरित करण्यास भाग पाडले जाईल आणि अशाप्रकारे हस्तांतरीत केलेल्या इक्विटी समभागाच्या बाबतीत कंपनीवर कोणतेही दायित्व राहणार नाही.:

१) **छापील स्वरूपातील धारणा असलेले समभाग** - डुप्लिकेट समभाग प्रमाणपत्रांचे सादरीकरण/पुष्टीकरण पत्र आणि संबंधित डिपॉझिटरीचे डुप्लिकेट समभाग प्रमाणपत्रामध्ये रुपांतर करणे/पुष्टीकरण पत्रांचे डीमॅटमध्ये रुपांतर करणे आणि त्यांचे आयईपीएफ डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरण करणे. भागधारकांच्या नावावर असलेले मूळ समभाग प्रमाणपत्र स्वयंचलितपणे रद्द होईल आणि वाटाघाटी करण्या योग्य नाही असे मानले जाईल.

२) **डिमटेरियलाइज्ड स्वरूपात धारणा असलेले समभाग** - आयईपीएफ डीमॅट खात्याच्या डिमटेरियलायझेशन खात्यात समभागांचे थेट हस्तांतरण करणे.

भागधारकांनी या गोष्टीची नोंद घ्यावी की अशा समभागांवर जर काही लाभ जमा झाले असतील तर, त्यासह आयईपीएफ/आयईपीएफ डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरीत झालेले समभाग आणि दावा करण्यात न आलेला लाभांश, या दोन्हींच्या बाबत, रूल्समध्ये वर्णन केलेल्या कार्यपद्धतीनुसार आयईपीएफ ऑथोरिटीकडे सादर समभागांसाठी दावा सादर करता येऊ शकेल.

भागधारकांनी या गोष्टीची नोंद घ्यावी की ०६ फेब्रुवारी, २०२६ च्या सेबी परिपत्रकानुसार आणि इतर संबंधित परिपत्रकानुसार, जर काही असेल तर इक्विटी समभाग संदर्भात थकबाकीची देयके थेट भौतिक स्वरुपात इक्विटी समभागधारकांच्या बँक खात्यांत, ती खाती केवायसीचे पालन करत असल्यास, थेट जमा केली जातील.

संबंधित विषयाबाबत भागधारकांना कोणत्याही प्रकारच्या शंका असल्यास ते कंपनीचे आर ॲण्ड टी एजंट्स यांच्याशी सी-१०१, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०००८३, या पत्त्यावर संपर्क साधू शकतात. दूरध्वनी: +९१ ८१०८१ १६७६७, ईमेल: rnt.helpdesk@in.mpms.mufg.com

फर्मेंटा बायोटेक लिमिटेड करिता
सही/-
वरदविनायक खांबेटे
कंपनी सचिव
तारीख : १६ सप्टेंबर २०२६
स्थळ : ठाणे

FBL/104/PREM ASSOCIATES-MAR